

*Anand Charitable Sanstha, Ashti's*

# Anandrao Dhonde Alias Babaji Mahavidyalaya,

## (Arts, Commerce and Science)

*Kada, Tal. Ashti. Dist. Beed 414 202 (Maharashtra)*

# Criteria III

## 3.4.1 Extension and outreach programmes organised during 2017-2018


**Phone**

+02441-2396210
+91 9421404246

**Contact**

admkada@gmail.com
www.admkada.com

**Address**

Anandrao Dhonde Alias Babaji
Mahavidyalaya Kada, Taq-Ashti,
District-Beed 414 202 (M.S.)


Made with PosterMyWall.com

Anand Charitable Sanstha Ashti's

**ANANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA**

(Arts, Commerce & Science)

KADA TAL. ASHTI, DIST. BEED (MS) - 414 202

E-mail. : admkada@gmail.com Website : www.admkada.com



NAAC 'A' Grade (3.11- CGPA) ISO 9001:2015 Certification **Prin. Dr. H.G. Vidhate**

Ref. No.ADMK / Date: / /

**3.4.1. Extension activities are carried out in the neighborhood Community, sensitizing students to social issues, for their holistic development, and impact thereof during the year.**

## Academic Year-2017-2018

| Sr.No. | Name of the Programme | Date |
|---|---|---|
| 1 | Help for 'Orphans' at Orphanage in Ahmednagar | 01.01.2018 |
| 2 | Constitution Awareness Workshop | 14.02.2018 To 15.02.2018 |

IQAC-Co-ordinator
Anandrao Dhonde Alias Babaji Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

Anandrao Dhonde Alias Babaji Mahavidyalaya * Kada, Tal. Ashti,

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji Mahavidyala
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

## "अनाथालयातील अनाथ व उपेक्षित बालकांसाठी मदत"

# अहवाल

दि. ०१.०१.२०१८ रोजी सदर यजमान संस्थेनी तीन हजार पॅम्प्लेट वाटून अहमदनगर येथील स्नेहालयातील अनाथ व उपेक्षित बालकांसाठी वापरात नसलेले कपडे उदा. स्वेटर, मफलर, कानटोपी, टी शर्ट, शर्ट, पॅन्ट, साडया, जुन्या नव्या हेल इत्यादी. खाऊ उदा. बिस्कीट, फरसाण, किराणा, धान्य इ. तसेच आपल्याकडील वापरात नसलेली खेळणी उदा. बॅगमध्ये भरून आपले नाव टाकून निराधार मुलांसाठी जमा करण्यासाठी आवाहन केले होते. महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभागातील विद्यार्थ्यांसाठी घरी जाऊन सर्व्हे करून साहित्य जमा केले व ते अहमदनगर येथील स्नेहालयास दिले.

कार्यक्रमाधिकारी
...विस्तार विभाग
आ... महाविद्यालय
...-४१४२०२

Anandrao Dhonde Alias Babaji Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टीचे

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

## ''केरळ पूरग्रस्तांसाठील मदतफेरी''

# अहवाल

दि. २८/०८/२०१८ रोजी आजीवन शिक्षण विभागाच्या वतीने कडा गावामध्ये केरळ पूरग्रस्तांसाठी मदत फेरी काढण्यात आली होती. फेरी आरंभ करण्यापूर्वी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते व कार्यक्रमाधिकारी डॉ. शाम सांगळे यांनी स्वयंसेवकांना फेरी संदर्भात योग्य त्या सूचना देऊन मार्गदर्शन केले. व्यापारी, शेतकरी, हमाल, छोटे-मोठे दुकानदार, वाटसरु, कामगार व प्रतिष्ठित नागरिकांनी सढळ हाताने दानपेटीमध्ये दान केले. पूरग्रस्त दानपेटीमध्ये एकूण १३,४६७/- रुपये निधी जमा झाला. या फेरीमध्ये विदयार्थी व विदयार्थीनी मोठया प्रमाणावर सहभागी झाले होते. यावेळी महाविदयालयाचे उपप्राचार्य डॉ.बी.एम. वाघुले, कार्यक्रमाधिकारी डॉ.सांगळे, डॉ. आर. जी. विधाते व महाविदयालयातील सर्व प्राध्यापक मदतफेरीमध्ये सहभागी झाले होते.



केरळ पुरग्रस्तांना मदत निधी गोळा करताना आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे विद्यार्थी समवेत ग्रामस्थ.

कार्यक्रमाधिकारी
आजीवन शिक्षण व विस्तार विभाग
आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय
कडा, ता. आष्टी, जि. बीड-४१४२०२

Anandrao Dhonde Alias Babaji Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti,

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed



केरळ पुरग्रस्तांना मदत निधी देताना हमाल
व मापाडी संघटनेचे सदस्य.



केरळ पुरग्रस्तांना मदत निधी देताना
बबन महाराज बहिरीवाल, डॉ.शाम सागळे, ग्रामस्थ कडा.

PRINCIPAL

आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टीचे

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

## ''म. गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती श्रमदानाने साजरी''

# अहवाल

दि. ०२/१०/२०१८ रोजी महाविदयालयातील सर्व कर्मचारी व निवडक स्वयंसेवक यांनी कडा येथील शिवकालीन बारव व परिसरात स्वच्छता करुन कच-याची योग्य विल्हेवाट लावली. श्रमदानानंतर त्याच ठिकाणी गांधी जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. एच.जी. विधाते, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. शाम सांगळे, इतर प्राध्यापक व सेवक, मा.ग्रा.पं.सदस्य शंकर देशमुख, बंटी गायकवाड व डॉ. संदेश देशमुख उपस्थित होते.





महात्मा गांधी व लाल बाहादुर शास्त्री जयंती निमित्त आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व सेवकांनी शिवकालीन बारव व परिसरात स्वच्छता करून साजरी केली.

कार्यक्रमाधिकारी
आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग
आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय
कडा, ता. आष्टी, जि. बीड-४१४२०२

Anandrao Dhonde Alias Babaji Mahavidyalaya
Kada,
Tal. Ashti,

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

# झुंजार नेता

■ बुधवार दि.३ ऑक्टोबर,२०१८ R.N.I.NO.16856/69, Postal No.- L/29/RNP/ Beed/ 20


## गांधी शास्त्री जयंती निमित्त आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापकांनी शिवकालीन बारव व परिसरात स्वच्छता केली

कडा ( वार्ताहर ):- आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापकांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त कडा शहरातील शिवकालीन बारव व परिसरात स्वच्छता करीत सुमारे एक टॅक्टर कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास विघाते यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजिवन शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करून सकाळी महाविद्यालय परिसरात स्वच्छता केली व साचलेला कचरा जाळून नष्ट केला. त्यानंतर कडा शहराच्या मध्यवस्तीत असलेल्या शिवकालीन बारव व परिसर अस्वच्छ केला. प्राचार्यांसह सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शिवकालीन बारव परिसरात हातात झाडू घेऊन स्वच्छता, परिसरातील काटेरी झाडे झुडपे तोडून टाकले, त्याचप्रमाणे पंधरा ते वीस शिक्षक शिवकालीन बारवात उतरून एक ना एक पायरी साफ करून आठवडी बाजारातल्या लोकांनी टाकलेला कचरा घमिल्याने वर काढला, सुमारे एक टॅक्टर भरून कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावली. याप्रसंगी माजी ग्रा पं सदस्य शंकरराव देशमुख, उपप्राचार्य डॉ. भगवान वापुले, विद्यमान सदस्य बाळासाहेब देशमुख, बंटी गायकवाड, पप्पु धुमाळ, काशिनाथ कडीले, दासी मामा, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, प्रा. डॉ. रघुनाथ विघाते, प्रताप परदेशी, मिलिंद देशमुख, सुधिर देशमुख, जयंत देशमुख व इतर ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाच्यानिमित्ताने रांगोळी व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच शनिवारी कडा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास प्राचार्य डॉ. हरिदास विघाते यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आंबेडकर चौक, ग्रामपंचायत कार्यालय परिसरात रा. से. यो. चे स्वयंसेवक व शिक्षकांनी स्वच्छता केली.



PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

दि. 4/10/2018
(गुरुवार)

पुण्य नगरी
smart Beed

# गांधी जयंतीनिमित्त शिवकालीन बारवाची स्वच्छता

## एक ट्रॅक्टर कचऱ्याची विल्हेवाट, विद्यार्थी, प्राध्यापकांचे श्रमदान



कडा ( प्रतिनिधी ): येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापकांनी राष्ट्रपिता म. गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त शिवकालीन बारव व परिसरात स्वच्छता करत सुमारे एक ट्रॅक्टर कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरीदास विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजिवन शिक्षण विभाग यांच्या वतीने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती त्यांना अभिवादन करून सकाळी महाविद्यालय परिसरात स्वच्छता केली. साचलेला कचरा जाळुन नष्ट केला. त्यानंतर कडा शहरात मध्यवस्तीत असलेल्या शिवकालीन बारव व परिसर अस्वच्छ झाला होता. प्राचार्या सह सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शिवकालीन बारव परिसरात हातात झाडू धरून स्वच्छता, परिसरातील काटेरी झाडे झुडपे तोडून टाकले, १५ ते २० शिक्षक बारवात उतरले. सर्व पायऱ्यांची सफाई करुन आठवडी बाजाराच्या लोकांनी टाकलेला कचरा घमेल्याने वर काढला. सुमारे एक ट्रॅक्टर भरुन कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावली. यावेळी शंकरराव देशमुख, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, बाळासाहेब देशमुख, बंटी गायकवाड, पप्पु धुमाळ, काशिनाथ कर्डीले, दाणी मामा, प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, प्रा. डॉ. रघुनाथ विधाते, प्रताप परदेशी, मिलिंद देशमुख, सुधिर देशमुख, जयंत देशमुख आदींचे सहकार्य लाभले.

### केंद्रेकरांनी दिली होती भेट

बीड येथे जिल्हाधिकारी असताना सुनिल केंद्रेकर यांनी कडा शहराच्या मध्यवस्तीत असलेल्या शिवकालीन बारवास भेट दिली होती. हा ऐतिहासिक ठेवा व्यवस्थित जतन करण्याचे आदेश दिले होते. परंतु आजही ही बारव दुर्लक्षीत असून विद्यार्थ्यांमुळे या बारवाची स्वच्छता झाल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

बीडचा
# लोकप्रश्न
epaper : www.lokprashna.com
२५४ ■ गुरुवार दि. ४ ऑक्टोबर २०१८ ■ Reg.No.L/Beed/21/2017-2019 RNI Reg. No.MAH

## गांधी जयंतीनिमित्त शिवकालीन बारवाची केली स्वच्छता



**कडा । वार्ताहर**

आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापकांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त कडा शहरातील शिवकालीन बारव व परिसरात स्वच्छता करीत सुमारे एक ट्रॅक्टर कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजिवन शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती त्यांना अभिवादन करून सकाळी महाविद्यालय परिसरात स्वच्छता केली व साचलेला कचरा जाळून नष्ट केला. त्यानंतर कडा शहरात मध्यवस्तीत असलेल्या शिवकालीन बारव व परिसर अस्वच्छ झाला होता. प्राचार्या सह सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शिवकालीन बारव परिसरात हातात झाडू घेऊन स्वच्छता, परिसरातील काटेरी झाडे झुडपे तोडून टाकले, त्याचप्रमाणे पंधरा ते वीस शिक्षक शिवकालीन बारवात उतरले सर्व पायऱ्यांची सफाई करून आठवडी बाजाराच्या लोकांनी टाकलेला कचरा पद्धतीने वर काढला, सुमारे एक ट्रॅक्टर भरून कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावली. याप्रसंगी माजी प्रा. पं. सदस्य शंकरराव देशमुख, उपप्राचार्य डॉ. भगवान वापुले, विद्यमान सदस्य बाळासाहेब देशमुख, मंटी गायकवाड, पप्पु घुमाळ, काशिनाथ कर्डीले, दाणी मामा, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, प्रा. डॉ. रघुनाथ निभाते, प्रताप परदेशी, मिलिंद देशमुख, सुधिर देशमुख, अनंत देशमुख व इतर ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

सकाळ

# Today बीड



PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada Ta. Ashti, Dist. Beed

बहि:शाल शिक्षण मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

व

## आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा, ता.आष्टी, जि.बीड

यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय

# संविधान जनजागृती शिबीर

प्रति,

मा. ______________________________

## उद्घाटन समारंभ

शुक्रवार दि. १४/१२/२०१८ रोजी सकाळी १०.०० वा

* अध्यक्ष- **मा. भिमरावजी धोंडे साहेब**
  आमदार आष्टी-पाटोदा-शिरुर
  संस्थापक अध्यक्ष, आनंद चॅरिटेबल संस्था

* उद्घाटक- **मा. प्राचार्य डॉ. कल्याणराव लघाने**
  माजी अधिष्ठाता व व्यवस्थापन परिषद सदस्य
  डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

---

दु. १२:०० वा. व्याख्यान पहिले:- भारतीय संविधानातील लोककल्याणकारी योजना

* व्याख्याते- मा.ॲड. वाल्मीकराव निकाळजे (संस्थापक प्रदेशाध्यक्ष, समता अधिकार आंदोलन)
* अध्यक्ष- मा. ॲड. बाबुराव अनारसे (जनरल सेक्रेटरी प्रांत,अखिल भारतीय अभिवक्ता परिषद)

---

दु. २:०० वा. व्याख्यान दुसरे:- संविधान कर्तव्य व अधिकार

* व्याख्याते- मा. ॲड. अजय जोशी (नोटरी पब्लीक, भारत सरकार)
* अध्यक्ष- मा. अशोकराव साळवे (आर.पी.आय. तालुका अध्यक्ष)

---

दु. ४:०० वा. सहभागी शिबीरार्थी प्रतिक्रिया

स्थळ **आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा, ता.आष्टी, जि.बीड**

## शनिवार दि. १५/१२/२०१८

सकाळी १०:०० वा. व्याख्यान तिसरे:- भारतीय संविधानाने आम्हाला काय दिले

* व्याख्याते- प्रा. संभाजी ओव्हाळ (प्रसिद्ध वक्ते, कडा ता. आष्टी, जि. बीड)
* अध्यक्ष- प्रा.डॉ. व्ही.बी.हुलगे (प्रमुख, राज्यशास्त्र विभाग)

---

दु. १२:०० वा. व्याख्यान चौथे:- भारतीय संविधान व मार्गदर्शक तत्वे

* व्याख्याते- प्रा.डॉ. भास्कर चव्हाण (प्रमुख, लोकप्रशासन विभाग)
* अध्यक्ष- प्रा.डॉ. बी.डी.गोरे (राज्यशास्त्र विभाग)

## समारोप समारंभ

शनिवार दि. १५/१२/२०१८ रोजी दुपारी ३.०० वा

* प्रमुख पाहुणे - **प्राचार्य बी.पी. गिन्हे**
  (श्रीराम कनिष्ठ महाविद्यालय, कडा)

* अध्यक्ष - **मा. डॉ. बी. एम. वाघुले**
  (उपप्राचार्य, आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय)

* संयोजक *

**डॉ. कैलास पाथ्रीकर**
संचालक
बहि:शाल शिक्षण मंडळ
डॉ. बा. आं.म. विद्यापीठ

**प्राचार्य डॉ.एच.जी. विधाते**
व्य. प. सदस्य, डॉ. बा. आं.म. विद्यापीठ
आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय,
कडा, ता.आष्टी, जि.बीड

# “संविधान जनजागृती शिबीर”

## अहवाल

दि. १७.१२.२०१८

दि. १४.१२.२०१८ रोजी आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये बहि:शाल शिक्षण मंडळ डॉ. बा.आं.मराठवाडा विद्यापीठ व आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय कडा ता. आष्टी यांचे संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय संविधान जनजागृती शिबीर आयोजित करण्यात आले होते. या संविधान जनजागृती शिबीराच्या उद्‌घाटन शिबीराचे अध्यक्ष म्हणून मा. आमदार भीमरावजी धोंडे साहेब हे होते. परंतु काही अपरिहार्य कारणामुळे ते येवू शकले नाही म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच्. जी. विधाते (विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य) हे होते. तर उद्‌घाटक म्हणून मा. प्राचार्य कल्याणराव लघाणे (माजी अधिष्ठाता व व्यवस्थापन परिषद सदस्य), डॉ. बा.आं. मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद हे होते. उद्‌घाटक म्हणून बोलताना प्राचार्य डॉ. कल्याणराव लघाणे म्हणाले की, भारतीय नागरिकाला जीवन जगण्यासाठी राज्यघटना उपयुक्त आहे. तसेच अध्यक्षीय विचार मांडताना प्राचार्य डॉ. एच्. जी. विधाते यांनी भारतीय संविधानाचे महत्व अधोरेखित केले.

उद्‌घाटना नंतर प्रथम सत्र दुपारी ठीक १२.०० वाजता सुरू करण्यात आले. या सत्राचे व्याख्याते म्हणून मा. ॲड. वाल्मिकराव निकाळजे (संस्थापक प्रदेशाध्यक्ष समता अधिकार आंदोलन) हे होते. या सत्राचे अध्यक्ष म्हणून मा. ॲड. बाबूराव अनारसे (जनरल सेक्रेटरी प्रांत, अखिल भारतीय अभिवक्ता परिषद) हे होते. मा. ॲड.वाल्मिकराव निकाळजे यांनी या सत्रामध्ये “भारतीय संविधानातील लोककल्याणकारी योजना” या विषयी

सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात मा. ॲड. बाबूराव अनारसे यांनी भारतीय संविधान आपणास किती उपयुक्त आहे. याचे उदाहरण देवून विवेचन केले. त्यानंतर जेवण करण्यासाठी वेळ देण्यात आला.

तसेच दुसरे सत्र दुपारी ठीक ०२.०० वाजता सुरू करण्यात आले. या सत्राचे व्याख्याते होते मा. ॲड. अजय जोशी (नोटरी पब्लिक भारत सरकार) आणि सत्राचे अध्यक्ष होते मा. अशोकराव साळवे (आरपीआय, तालुका अध्यक्ष). या सत्रामध्ये मा. ॲड. अजय जोशी यांचा विषय होता "संविधान कर्तव्य व अधिकार". मा. ॲड. अजय जोशी यांनी विषयाला शंभर टक्के न्याय देवून विद्यार्थ्यांना हक्क आणि कर्तव्य याचे महत्व पटवून दिले. या सत्राचे अध्यक्ष मा. अशोकराव साळवे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधान या विषयी मत मांडले. त्यानंतर सहभागी विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यात आल्या. अशा प्रकारे प्रथम दिवशी ठरल्याप्रमाणे कार्यक्रम यशस्वी पार पडला.

शनिवार दि. १५.१२.२०१८ शिबीराचा दुसरा दिवस सत्र तिसरे. या दिवशी ठीक १०.०० वाजता सत्र सुरू करण्यात आले. या सत्राचे व्याख्याते होते प्रा. संभाजी ओव्हाळ व अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. व्ही.बी. हुलगे (राज्यशास्त्र विभागप्रमुख) हे उपस्थित होते. प्रा. संभाजी ओव्हाळ यांनी "भारतीय संविधानाने आम्हाला काय दिले" याविषयी मार्गदर्शन केले. तसेच अध्यक्षीय विचार मांडताना प्रा. डॉ. हुलगे यांनी घटनेची पार्श्वभूमी सांगितली.

शनिवार दुपारी ठीक १२.०० वाजता चौथे सत्र सुरू करण्यात आले. या सत्राचे व्याख्याते प्रा. डॉ. भास्कर चव्हाण (लोकप्रशासन विभागप्रमुख) उपस्थित होते. त्यांचा विषय "भारतीय संविधान व मार्गदर्शक तत्वे" याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. बी.डी. गोरे (राज्यशास्त्र विभाग) हे होते. त्यांनी अध्यक्षीय विचार

मांडताना भारतीय संविधान प्रत्येक घटकासाठी कसे उपयुक्त आहे हे सांगितले.

शनिवार दि. १५.१२.२०१८ रोजी दुपारी ०३.०० वाजता समारोप समारंभ घेण्यात आला. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. भगवानराव वाघुले हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य बी.पी. गिऱ्हे हे होते. प्रमुख पाहुण्यांनी या दोन दिवशीय शिबीराची प्रशंसा केली व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. भगवानराव वाघुले यांनी शिबीर यशस्वी केल्याचे समाधान व्यक्त केले व कार्यक्रमाची सांगता झाली.

Anandrao Dhonde Alias Babaji College, Kada, Tal. Ashti

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

बीडचा
# लोकप्रश्न
epaper : www.lokprashna.com
अंक ३२४ ■ रविवार, दि.१६ डिसेंबर २०१८ ■ Reg.No.L / Beed/21/2017-2019 RNI Reg. No.MAHM

## कडा येथे संविधान जनजागृती शिबिराचे मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन



कडा । वार्ताहर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा बहि:शाल शिक्षण मंडळ विभाग व कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय संविधान जनजागृती शिबिराचे उद्घाटन समता अधिकार आंदोलनाचे अध्यक्ष वाल्मिकराव निकाळजे, आष्टी तालुका वकिल संघाचे माजी अध्यक्ष ॲड.बाबुराव अनारसे, प्राचार्य डॉ.कल्याण लघाणे व ॲड.अजय जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले, यावेळी अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या व्यावस्थापण परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ.हरीदास विधाते होते. प्रारंभी कडा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर येथील पुतळ्यास ॲड.बाबुराव अनारसे, ॲड.वाल्मिकी निकाळजे, रिपाइंचे

◂◂ पान २ वर

### कडा येथे संविधान जनजागृती

तालुकाध्यक्ष अशोक साळवे, प्राचार्य डॉ.हरीदास विधाते, सरपंच अनिल ढोबळे, काशिनाथ कर्डीले, मधुकर शिरोळे, प्रा.संभाजी ओव्हाळ, दिपक गरुड, पँथर साळवे यांच्या उपस्थितीत कडा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरीदास विधाते होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक प्रा.डॉ.भास्कर चव्हाण यांनी केले, सुत्रसंचलन प्रा.डॉ.रघुनाथ विधाते यांनी व उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.राम बोडखे यांनी मानले.

चंपावतीपत्र

वार-रविवार दि.१६/१२/२०१८

# कडा येथे दोन दिवसीय संविधान जनजागृती शिबिराचे मान्यवरांचे उपस्थितीत उद्घाटन संपन्न



**आष्टी । वार्ताहार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा बहि:शाल शिक्षण मंडळ विभाग व कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय संविधान जनजागृती शिबिराचे उद्घाटन समता अधिकार आंदोलनाचे अध्यक्ष वाल्मिकराव निकाळजे, आष्टी तालुका वकिल संघाचे माजी अध्यक्ष ॲड. बाबुराव अनारसे, प्राचार्य डॉ. कल्याण लघाणे व ॲड. अजय जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले, यावेळीअध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या व्यावस्थापण परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ हरीदास विधाते होते.प्रारंभी कडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर येथील पुतळ्यास ॲड. बाबुराव अनारसे,समता अधिकार आंदोलन संघटनेचे अध्यक्ष ॲड. वाल्मिकी निकाळजे, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, प्राचार्य डॉ. हरीदास विधाते, सरपंच अनिल ढोबळे, काशिनाथ कर्डीले, मधुकर शिरोळे, दिपक गरुड, पँथर साळवे यांच्या उपस्थितीत कडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरीदास विधाते होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यावस्थापण परिषदेचे माजी सदस्य प्राचार्य डॉ. कल्याण लघाने, वाल्मिकराव निकाळजे, अशोक साळवे,भारत सरकार नोटरीयन ॲड. अजय जोशी , प्राचार्य डॉ. कैलास वायभासे, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, प्राचार्य बाबासाहेब गिर्हे, प्रा. डॉ. अनिल वाघ व इतरांची उपस्थिती होती. यावेळी भारतीय संविधानातील लोककल्याणकारी योजना या विषयावर पुढे बोलताना वाल्मिकराव निकाळजे यांनी सांगितले की, देशाचा पाया भक्कम करण्याचे काम शिक्षक व शास्त्रज्ञ करतात त्यामुळे पाश्र्चात्य देशात शिक्षक व शास्त्रज्ञांना मानाचे स्थान आहे, परंतु आपल्याकडे मात्र शिक्षकांना मानाचे स्थान दिले जात नाही. आपल्या देशातील पालक व विद्यार्थी यांचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होत आहे. प्रत्येकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधानाचे वाचन करून ते समजून घेतले पाहिजे . कॉपी करून पास झालेला विद्यार्थी जिवनात यशस्वी होत नाही. ॲड. बाबुराव अनारसे यांनी सांगितले की, विद्यार्थी व शिक्षकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या विविध कायदेविषयक पुस्तकांचे वाचन करावे, याप्रसंगी ॲड. अजय जोशी यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकाचे वाचन केले. यावेळी अशोक साळवे यांनी संविधानाबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमास आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे व गंगाई फार्मसी महाविद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी केले, सुत्रसंचलन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी व उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. राम बोडखे यांनी मानले.

झुंजार नेता

महाराष्ट्र ■ शनिवार दि.१५ डिसेंबर २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/

# कडा येथे दोन दिवसीय संविधान जनजागृती शिबिराचे मान्यवरांचे उपस्थितीत उद्घाटन संपन्न

कडा, दि.१४ (प्रतिनिधी):- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा बहि:शाल शिक्षण मंडळ विभाग व कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय संविधान जनजागृती शिबिराचे उद्घाटन समता अधिकार आंदोलनाचे अध्यक्ष वाल्मिकराव निकाळजे, आष्टी तालुका वकिल संघाचे माजी अध्यक्ष ॲड. बाबुराव अनारसे, प्राचार्य डॉ. कल्याण लघाणे व ॲड. अजय जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले, यावेळी अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या व्यावस्थापण परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. हरीदास विधाते होते.

प्रारंभी कडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर येथील पुतळ्यास ॲड. बाबुराव अनारसे, ॲड. वाल्मिकी निकाळजे, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, प्राचार्य डॉ. हरीदास विधाते, सरपंच अनिल ढोबळे, काशिनाथ कर्डीले, मधुकर शिरोळे, प्रा संभाजी ओव्हाळ, दिपक गरुड, पँथर साळवे यांच्या उपस्थितीत कडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

त्यानंतर महाविद्यालयात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरीदास विधाते होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यावस्थापण परिषदेचे माजी सदस्य प्राचार्य डॉ. कल्याण लघाने, वाल्मिकराव निकाळजे, अशोक साळवे, नोटरीयन ॲड. अजय जोशी, प्राचार्य डॉ. कैलास वायभासे, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, प्राचार्य बाबासाहेब गिर्हे, प्रा. डॉ. अनिल वाघ व इतरांची उपस्थिती होती.

यावेळी भारतीय संविधानातील लोककल्याणकारी योजना या विषयावर पुढे बोलताना वाल्मिकराव निकाळजे यांनी सांगितले की, देशाचा पाया भक्कम करण्याचे काम शिक्षक व शास्त्रज्ञ करतात त्यामुळे पाश्चात्य देशात शिक्षक व शास्त्रज्ञांना मानाचे स्थान आहे, परंतु आपल्याकडे मात्र शिक्षकांना मानाचे स्थान दिले जात नाही. आपल्या देशातील पालक व विद्यार्थी यांचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होत आहे. प्रत्येकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधानाचे वाचन करून ते समजून घेतले पाहिजे. कॉपी करुन पास झालेला विद्यार्थी जिवनात यशस्वी होत नाही. ॲड. बाबुराव अनारसे यांनी सांगितले की, विद्यार्थी व शिक्षकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या विविध कायदेविषयक पुस्तकांचे वाचन करावे, याप्रसंगी ॲड. अजय जोशी यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकाचे वाचन केले. यावेळी प्राचार्य डॉ कल्याण लघाणे, प्राचार्य डॉ हरीदास विधाते व अशोक साळवे यांनी संविधानाबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमास आनंदराव धोंडे महाविद्यालय व गंगा फार्मसी महाविद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी केले, सुत्रसंचलन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी व उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. राम बोडखे यांनी मानले.

लातूर । रविवार, १६ डिसेंबर २०१८

। वर्ष : १४ । अंक : २५५ । किंमत : ५.०० । पाने १०+४+६ = २०

# पुण्य नगरी

www.epunyanagari.com | Toll Free 9773927928

## दोन दिवसीय संविधान जागृती शिबीर

**कडा / प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा बहि:शाल शिक्षण मंडळ विभाग व कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय संविधान जनजागृती शिबिराचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरिदास विधाते तर व्यासपीठावर समता अधिकार आंदोलनाचे अध्यक्ष वाल्मिकराव निकाळजे, अॅड. बाबुराव अनारसे, प्राचार्य डॉ. कल्याण लघाणे, अॅड. अजय जोशी आदी उपस्थित होते.

प्रारंभी डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास अॅड. बाबुराव अनारसे, अॅड. वाल्मिकी निकाळजे, अशोक साळवे, प्राचार्य डॉ. हरीदास विधाते, सरपंच अनिल ढोबळे, काशिनाथ कर्डीले, मधुकर शिरोळे, प्रा. संभाजी ओव्हाळ, दीपक गरुड, पँथर साळवे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास आनंदराव धोंडे महाविद्यालय व गंगाई फार्मसी महाविद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.प्रास्ताविक प्रा.डॉ. भास्कर चव्हाण यांनी केले, सूत्रसंचलन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी व उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. राम बोडखे यांनी मानले.

मा. न्यायालय, सहकार

ज्या अर्थी वादी जयभवानी सहकारी स
केलेल्या दाव्यामध्ये न्यायालयातर्फे समन्स का
जाहीर समन्स काढण्यासाठी विनंती केली. त्य
सुनावणी दि.३१/१२/२०१८ रोजी सकाळी
तारखेस मा.न्यायाधीश, सहकार न्यायालय

संविधान जनजागृती शिबीर १४, १५ डिसें. २०१८



शिबीराचे उद्घाटन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य
व
इतर मान्यवर.....



उद्घाटक मा. प्राचार्य, डॉ. कल्याणराव लधाने...




पहिल्या सत्राचे व्याख्याते मा. ॲड. वाल्मीकराव निकाळजे मार्गदर्शन करताना....




पहिल्या सत्राचे अध्यक्ष मा. ॲड. बाबुराव अनारसे मार्गदर्शन करताना....




दुसऱ्या सत्राचे व्याख्याते मा. ॲड. अजय जोशी व इतर मान्यवर संविधान जोपासनेची शपथ देताना...




दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष मा. अशोकराव साळवे मार्गदर्शन करताना...




तिसऱ्या सत्राचे व्याख्याते प्रा. संभाजी ओव्हाळ मार्गदर्शन करताना....




चौथ्या सत्राचे व्याख्याते प्रा. डॉ. भास्कर चव्हाण मार्गदर्शन करताना....




समारोप समारंभाचे अध्यक्ष मा. डॉ. बी. एम. वाघुले यांचा सत्कार करताना आयोजक प्रा. डॉ. बी. एम. चव्हाण...

शिबीरात सहभागी विद्यार्थी - विद्यार्थीनी

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी, संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

(कला, वाणिज्य व विज्ञान)

ता. आष्टी, जि. बीड (महाराष्ट्र) ४१४ २०२

☎ (०२४४१) २३९६२१

E-mail. : admkada@gmail.com Website : www.admkada.com

नॅक दर्जा -"A" ISO 9001:2008 Certification प्राचार्य : डॉ. एच्. जी. विधाते

जा.क्र. : आधोंमक /2018-2019/223 दि. 10/12/2018

प्रति,
मा. भीमरावजी धोंडे साहेब आमदार, (आष्टी/पाटोदा /शिरूर )
संस्थापक अध्यक्ष,
आनंद चॅरिटेबल संस्था,आष्टी

विषय- संविधान जनजागृती शिबीराचे उद्‌घाटन प्रसंगी अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणे बाबत..

संदर्भ- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच दि. 06/09/2018 चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयी विनंती की, शुक्रवार दि.14/12/2018 रोजी बहि:शाल शिक्षण मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व आमचे महाविद्यालयाचे संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय "संविधान जनजागृती शिबीर" आयोजित करण्यात आले आहे.

सदर शिबीराचे उद्घाटन शुक्रवार दिनांक 14/12/218 रोजी सकाळी 9.30 वा. होत आहे. या शिबीर उद्‌घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षपद आपण भूषवावे अशी आमची इच्छा आहे. तरी या कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थान भूषवून शिबीरार्थ्यांना समयोचीत मार्गदर्शन करावे.

ही नम्र विनंती,

आपला विश्वासू,

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी, संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

(कला, वाणिज्य व विज्ञान)

ता. आष्टी, जि. बीड (महाराष्ट्र) ४१४ २०२

☎ (०२४४१) २३९६२१

E-mail. : admkada@gmail.com Website : www.admkada.com



नॅक दर्जा –"A" ISO 9001:2008 Certification प्राचार्य : डॉ. एच्. जी. विधाते

जा.क्र. : आधोंमक /2018-2019/215 दि. 10/12/2018

प्रति,
मा. ॲड. बाबुराव अनारसे, (विधीज्ञ),
मा. अध्यक्ष, वकिल संघ दिवनी व सत्र न्यायालय आष्टी.
अध्यक्ष, पंडीत दिनदयाळ उपाध्याय सह. पतसंस्था, आष्टी,
~~आष्टी~~

विषय- संविधान जनजागृती शिबीरातील व्याख्यानाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणे बाबत..

संदर्भ- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच दि. 06/09/2018 चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयी विनंती की, शुक्रवार दि.14/12/2018 रोजी बहि:शाल शिक्षण मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व आमचे महाविद्यालयाचे संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय "संविधान जनजागृती शिबीर" आयोजित करण्यात आले आहे.

सदर शिबीरामध्ये "भारतीय संविधानातील लोककल्याणकारी योजना " या विषयावर ॲड. वाल्मिकराव निकाळजे हे व्याख्यान देणार आहेत. या व्याख्यानाचे प्रसंगी अध्यक्ष म्हणून आपण उपस्थित रहावे व विषयाचे अनुशंघाने मत व्यक्त करावे.

ही नम्र विनंती,

आपला विश्वासू,

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी, संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

(कला, वाणिज्य व विज्ञान)

ता. आष्टी, जि. बीड (महाराष्ट्र) ४१४ २०२

☎ (०२४४१) २३९६२१

E-mail. : admkada@gmail.com Website : www.admkada.com



नॅक दर्जा -"A" ISO 9001:2008 Certification प्राचार्य : डॉ. एच्. जी. विधाते

जा.क्र. : आधोंमक / 2018-2019/217

दि. 10/12/2018

प्रति,
मा. अशोकराव साळवे, (सामाजिक कार्यकर्ते )
तालुका अध्यक्ष, आरपी आय
ता.आष्टी

विषय- संविधान जनजागृती शिबीरातील व्याख्यानाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणे बाबत..

संदर्भ- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच दि. 06/09/2018 चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयी विनंती की, शुक्रवार दि.14/12/2018 रोजी बहि:शाल शिक्षण मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व आमचे महाविद्यालयाचे संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय "संविधान जनजागृती शिबीर" आयोजित करण्यात आले आहे.

सदर शिबीरामध्ये "भारतीय संविधान कर्तव्य व अधिकार" या विषयावर ॲड. अज. जोशी हे व्याख्यान देणार आहेत. या व्याख्यानाचे प्रसंगी अध्यक्ष म्हणून आपण उपस्थित रहावे व विषयाचे अनुशंघाने मत व्यक्त करावे.

ही नम्र विनंती,

आपला विश्वासू

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

O/C Received

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी, संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

(कला, वाणिज्य व विज्ञान)



ता. आष्टी, जि. बीड (महाराष्ट्र) ४१४ २०२

☎ (०२४४१) २३९६२१

E-mail. : admkada@gmail.com   Website : www.admkada.com

प्राचार्य : डॉ. एच्. जी. विधाते

नॅक दर्जा -"A"   ISO 9001:2008 Certification


दि. 10/12/2018

जा.क्र. : आधोंमक /2018-2019/216

प्रति,
मा. ॲड. अजय जोशी
नोटरी पब्लीक, भारत सरकार,
दिवानी व सत्र न्यायलय आष्टी जि.बीड

विषय- संविधान जनजागृती शिबीरामध्ये व्याख्याते म्हणून उपस्थित राहणे बाबत.

संदर्भ- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच दि. 06/09/2018 चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयी विनंती की, शुक्रवार दि.14/12/2018 रोजी बहि:शाल शिक्षण मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व आमचे महाविद्यालयाचे संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय "संविधान जनजागृती शिबीर" आयोजित करण्यात आले आहे.

सदर शिबीरामध्ये विद्यार्थी व उपस्थितांना "भारतीय संविधान कर्तव्य व अधिकार" या विषयावर व्याख्यान देण्यासाठी उपस्थित राहून शिबीरार्थींना मार्गदर्शन करावे.

आपण निमंत्रण स्विकारून होकार कळवावा.

आपला विश्वासू,

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

12-12-18

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी, संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

(कला, वाणिज्य व विज्ञान)

ता. आष्टी, जि. बीड (महाराष्ट्र) ४१४ २०२

☎ (०२४४१) २३९६२१

E-mail. : admkada@gmail.com Website : www.admkada.com



नॅक दर्जा -"A" ISO 9001:2008 Certification प्राचार्य : डॉ. एच्. जी. विधाते

जा.क्र. : आधोंमक /2018-2019/227 दि. 10 / 12 / 2018

प्रति,
मा. प्राचार्य
डॉ. बाबाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न,
सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य

विषय- संविधान जनजागृती शिबीरासाठी दोन विद्यार्थी पाठवणे बाबत..

संदर्भ- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच दि. 06/09/2018 चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयी विनंती की, शुक्रवार दि.14/12/2018 रोजी बहि:शाल शिक्षण मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व आमचे महाविद्यालयाचे संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय "संविधान जनजागृती शिबीर" आमचे महाविद्यालयात आयोजित करण्यात आले आहे.

आपल्या महाविद्यालयाचे दोन विद्यार्थी सहभागी होण्यासाठी पाठवावेत शिबीरार्थीची राहण्याची व जेवणाची व्यवस्था महाविद्यालयातर्फे करण्यात येणार आहे. तसेच सहभागी शिबीरार्थींना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल .

तरी आपले महाविद्यालयाचे दोन प्रतिनिधी पाठवून शिबीर यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे.

ही नम्र विनंती,

आपला विश्वासू

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी, संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

(कला, वाणिज्य व विज्ञान)

ता. आष्टी, जि. बीड (महाराष्ट्र) ४१४ २०२

☎ (०२४४१) २३९६२१

E-mail : admkada@gmail.com Website : www.admkada.com

नॅक दर्जा -"A" ISO 9001:2008 Certification प्राचार्य : डॉ. एच्. जी. विधाते

जा.क्र. : आर्धोमक /2018-2019/227 दि. 10/12/2018

प्रति,
मा. प्राचार्य
डॉ. बाबाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न,
सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य

विषय- संविधान जनजागृती शिबीरासाठी दोन विद्यार्थी पाठवणे बाबत..

संदर्भ- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच दि. 06/09/2018 चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयी विनंती की, शुक्रवार दि 14/12/2018 रोजी बहि:शाल शिक्षण मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व आमचे महाविद्यालयाचे संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय "संविधान जनजागृती शिबीर" आमचे महाविद्यालयात आयोजित करण्यात आले आहे.

आपल्या महाविद्यालयाचे दोन विद्यार्थी सहभागी होण्यासाठी पाठवावेत शिबीरार्थीची राहण्याची व जेवणाची व्यवस्था महाविद्यालयातर्फे करण्यात येणार आहे. तसेच सहभागी शिबीरार्थीना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

तरी आपले महाविद्यालयाचे दोन प्रतिनिधी पाठवून शिबीर यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे.

ही नम्र विनंती,

आपला विश्वासू

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी, संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

(कला, वाणिज्य व विज्ञान)

ता. आष्टी, जि. बीड (महाराष्ट्र) ४१४ २०२

☎ (०२४४१) २३९६२१

E-mail : admkada@gmail.com Website : www.admkada.com

प्राचार्य : डॉ. एच्. जी. विधाते

नॅक दर्जा -"A" ISO 9001 2008 Certification

दि. 10/12/2018

जा.क्र. : आधोंमक / 2018-2019/221

प्रति,
मा. डॉ. चव्हाण बी. एम.
विभाग प्रमुख, लोकप्रशासन विभाग,
आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय कडा

विषय- संविधान जनजागृती शिबीरामध्ये व्याख्याते म्हणून उपस्थित राहणे बाबत..

संदर्भ- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच दि. 06/09/2018 चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयी विनंती की, शुक्रवार दि.14/12/2018 रोजी बहि:शाल शिक्षण मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व आमचे महाविद्यालयाचे संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय "संविधान जनजागृती शिबीर" आयोजित करण्यात आले आहे.

सदर शिबीरामध्ये दि.15/12/2016 रोजी विद्यार्थी व उपस्थितांना "भारतीय संविधान व मागदर्शक तत्वे " या विषयावर व्याख्यान देण्यासाठी उपस्थित राहून शिबीरार्थींना मार्गदर्शन करावे.

आपण निमंत्रण स्विकारून होकार कळवावा.

आपला विश्वासू,

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

o/c

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी, संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

(कला, वाणिज्य व विज्ञान)

ता. आष्टी, जि. बीड (महाराष्ट्र) ४१४ २०२

☎ (०२४४१) २३९६२१

E-mail : admkada@gmail.com Website : www.admkada.com

नॅक दर्जा -"A" ISO 9001 2008 Certification प्राचार्य : डॉ. एच्. जी. विधाते

जा.क्र. : आधोंमक /2018-2019/218 दि. 10/12/2018

प्रति,
मा. प्रा. संभाजी ओव्हाळ
प्रसिध्द व्याख्याते.
आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय कडा.

विषय- संविधान जनजागृती शिबीरामध्ये व्याख्याते म्हणून उपस्थित राहणे बाबत..

संदर्भ- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच दि. 06/09/2018 चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयी विनंती की. शुक्रवार दि 14/12/2018 रोजी बहि:शाल शिक्षण मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व आमचे महाविद्यालयाचे संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय "संविधान जनजागृती शिबीर" आयोजित करण्यात आले आहे.

सदर शिबीरामध्ये दि.15/12/2016 रोजी विद्यार्थी व उपस्थितांना "भारतीय संविधानाने आम्हाला काय दिले? " या विषयावर व्याख्यान देण्यासाठी उपस्थित राहून शिबीरार्थींना मार्गदर्शन करावे. आपण निमंत्रण स्विकारून होकार कळवावा.

ही नम्र विनंती,

आपला विश्वासू,

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

O/C

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी, संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

(कला, वाणिज्य व विज्ञान)

ता. आष्टी, जि. बीड (महाराष्ट्र) ४१४ २०२

☎ (०२४४१) २३९६२१

E-mail : admkada@gmail.com Website : www.admkada.com

ISO 9001:2008 Certification

नॅक दर्जा -"A"

प्राचार्य : डॉ. एच्. जी. विधाते



दि. 10/12/2018

जा.क्र. : आधौमक /2018-2019/219

प्रति,
मा. डॉ. व्ही. बी. हुलगे
विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग,
आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा

विषय- संविधान जनजागृती शिबीरातील व्याख्यानाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणे बाबत.

संदर्भ- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच दि. 06/09/2018 चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयी विनंती की, शुक्रवार दि.14/12/2018 रोजी बहि:शाल शिक्षण मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व आमचे महाविद्यालयाचे संयुक्त विद्यमाने दो., दिवसीय "संविधान जनजागृती शिबीर" आयोजित करण्यात आले आहे.

सदर शिबीरामध्ये दि.15/12/2016 रोजी "भारतीय संविधानाने आम्हाला काय दिले" या विषयावर प्रा. ओव्हाळ एस.डी. हे व्याख्यान देणार आहेत. या व्याख्यानाचे प्रसंगी अध्यक्ष म्हणून आपण उपस्थित रहावे व विषयाचे अनुशंघाने मत व्यक्त करावे.

ही नम्र विनंती,

आपला विश्वासू

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

Received

Anand Charitable Sanstha Ashti's

# Anandrao Dhonde Alias Babaji College Kada Tal- Ashti Dist- Beed

Affiliated to

Dr. Babasaheb Ambedkar Marathawada University Aurangabad

**Constitution Awareness Campaign (Shibir) Date :- 14/15 Dec. 2018**

| Receipt | Rs. | Payment | Rs. |
|---|---|---|---|
| Received Grant Registrar Dr.B.A.M.U. Aurangabad | 50000 | Printing Exp. | 1000 |
| | | Stationary Exp | 1200 |
| | | Digital Board Exp. | 420 |
| | | Felicitation Exp. | 920 |
| | | Photo Exp. | 310 |
| | | Tea & Refreshment | 3800 |
| | | Meal Exp. Che.008472 | 28200 |
| | | Traveling Exp. | 1750 |
| | | Audit Fees | 400 |
| | | Resource Persons Remuneration<br>1. DR.Kalyan Laghane 3000<br>2. Adv. Walmik Nikalge 2500<br>3. Adv. Anarse Baburao 2500<br>4. Adv. Joshi Ajay 2500<br>5. Shri. Ashok Salve 1500 | 12000 |
| **Total :-** | **50000** | **Total :-** | **50000** |

Programme Co-ordination

Charterd Accountant

Principal

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

CHARTERED ACCOUNTANTS ... 11386 BEED.

# UTILIZATION CERTIFICATE

Certified that the Principal Anandrao Dhonde Alias Babaji college Kada has Incurred the total expenditure of 50,000 ( Rs. Fifty Thousand Only) towards the implementation of extension activates (Constitution Awareness Campaign, Two Days ) during the Academic period 2018-19.

The Balance of 50,000 is credited in the bank of Maharashtra Gramin Bank Branch, Kada.

Program Officer

Principal

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College Kada Tal Ashti, Dist Beed

Chartered Accountant